दै. गोदातीर समाचार दि. १६/१२/२०२२

गोदातीर समाचार दि. १६/१२/२०२२

# हायवा ट्रक चोरून त्याचे तुकडे करून विकणारी टोळी स्थानिक गुन्हे शाखेने केली अटक; ४८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड-** शहर, जिल्हा व आसपासच्या जिल्ह्यातून हायवा ट्रकसह अन्य वाहने चोरी करून त्यांचे तुकडे करून विकणारी टोळी नांदेडच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात अडकली आहे. ही कारवाई १४ डिसेंबर रोजी नांदेड शहरातील धनेगाव परिसरात असलेल्या सूर्या गार्डनजवळील सिराज अहमद जलील अहमद याच्या गोडाऊनमध्ये करण्यात आली. पोलिसांनी सात आरोपींना अटक केली असून ४८ लाखाचा मुद्देमाल त्यांच्याकडून जप्त करण्यात आला आहे. सध्या सर्व आरोपी हे लोहा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहेत.

नांदेड शहर तसेच लोहा येथून आणि काही गंगाखेड परिसरातून हायवा व अन्य वाहनांची चोरी



करून त्यांचे जीपीएस काढून हे चोरटे नांदेडच्या धनेगांव परिसरातील सूर्या गार्डनजवळ असलेल्या सिराज अहमद जलील अहमद राहणार गाडीपुरा याच्या गोडाऊनमध्ये आणत असत. येथे आणल्यानंतर गॅस कटर व अन्य साहित्याच्या मदतीने आणलेल्या वाहनांचे तुकडे करत व हे स्पेअर पार्ट आणि तुकडे नांदेडमध्ये किंवा शेजारील राज्यात विकत होते.

लोहा येथे आणि गंगाखेड पोलीस ठाण्यात तीन हायवा चोरी गेल्याचे गुन्हे दाखल झाले होते. परंतु या वाहनांचा शोध पोलिसांना लागत नव्हता. अखेर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांना मिळालेल्या गुप्त माहितीवरून त्यांनी आपले वरिष्ठ अधिकारी पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांना ही माहिती सांगितली. त्यांच्या आदेशावरून आपल्या पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय काळे, सचिन सोनवणे, आशिष बोराटे, जसवंत सिंग साहू, परमेश्वर चव्हाण, सहायक पोलीस उपनिरीक्षक संजय केंद्रे, **(पान ३ वर...)**

दै. गोदातीर समाचार दि. १६/१२/२०२२

# नांदेडमध्ये पुन्हा गावठी पिस्टलसह तीन जिवंत काडतुस जप्त, आरोपी अटकेत

## नांदेडच्या शिवाजीनगर गुन्हे शोध पथकाची कारवाई

**नांदेड-** शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने गस्त दरम्यान एका आरोपीला अटक केली. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडून एक गावठी पिस्तूल, तीन जिवंत काडतूस आणि एक मॅग्झिन आढळून आली, पोलिसांनी ती जप्त केली आहे. ही कारवाई आज गुरुवार दि.१५ डिसेंबर रोजी करण्यात आली. सोमवारीही एका युवकाकडून गावठी पिस्टलसह जिवंत काडतूसं जप्त करण्यात आली होती, हा युवक एका खुनाच्या प्रकरणातील फरार आरोपी होता. यानंतर आज पुन्हा जिवंत काडतुसांसह गावठी पिस्टल जप्त करण्यात आले आहे.

शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे गुन्हे शोध पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार असे दत्तनगर, खोब्रागडेनगर, भागात गस्त (पेट्रोलींग) करत असतांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे दत्तनगर येथील आदिनारायण हॉस्पीटलच्या समोरील रोडवर बांजुला एक युवक साई दिपकसिंह गहेरवार (वय २२) रा. बाबानगर नांदेड (ह. मु. ढवळे कॉर्नर, सिडको नांदेड)



यास ताब्यात घेवुन त्याची अंगझडती घेतली. तेव्हा त्याच्या कमरेला एक गावठी पिस्टल (किंमत ४० हजार रूपये) व मॅग्झीन मध्ये तीन जिवंत काडतूस (किंमत दीड हजार रूपये) असा एकुण ४१ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

शिवाजीनगर गुरन ४४३/ २०२२ कलम ३/२५ भाहका कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आले. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, डॉ. खंडेराव धरणे, उप विभागीय पोलीस अधिकारी (शहर) चंद्रसेन देशमुख, पोलीस निरीक्षक डॉ. नितीन काशीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक रवी वाहुळे, फौजदार मिलींद सोनकांबळे, हवालदार शेख इब्राहीम, दिलीप राठोड, अंमलदार रवि बामणे, दत्ता वडजे, देवीसिंग सिंघल, शेख अझर, विष्णु डफडे यांनी केली आहे.